***The Research Analytics*** **ISSN (Online): 3107-6165**
**Volume 3, Special Issue 1, Jan 2026**

***The Research Analytics***
**(A Peer Reviewed and Open Access Journal)**

**20**

# नंदुरबार जिल्ह्यातील लिंग-गुणोत्तराचा तुलनात्मक अभ्यास

[1]श्री.टी. पी. वळवी [2]डॉ. आर.आर. देवरे

1) **(संशोधक विद्यार्थी) ग. तु. पाटील कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नंदुरबार**
2) **(संशोधक सहमार्गदर्शक) ग. तु. पाटील कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नंदुरबार**

Pages No: 149-156

## ***सारांश***

*प्रस्तुत शोध-निबंधामध्ये नंदुरबार जिल्ह्यातील लिंगगुणोत्तराचा अभ्यास करण्यात आला आहे. १९९१ ते २०११ या कालखंडातील भारत, महाराष्ट्र व नंदुरबार जिल्ह्यातील लिंगगुणोत्तराचा तुलनात्मक अभ्यास करण्यात आला आहे. लिंग-गुणोत्तर म्हणजे दर १००० पुरुषांमागे एकूण स्त्रियाचे प्रमाण होय. भारत, महाराष्ट्र आणि नंदुरबार जिल्ह्याचे लिंग-गुणोत्तर हे १९९१ ते २०११ या कालावधीत स्त्रियांचे प्रमाण वाढ होताना दिसते. यात भारतात १९९१ चे स्त्रियांचे प्रमाण हे ९२७ एवढे झाले. तर महाराष्ट्रातील स्त्रियांचे प्रमाण १९९१ ला ९३४ एवढे वाढ झाले आहे. यात ७ अंकांनी वाढ झालेली दिसून येते. नंदुरबार जिल्हाचा अभ्यास केला तर १९९१ मध्ये ९७५ स्त्रियांचे प्रमाण होते ते २०११ मध्ये ९७८ एवढे वाढ झाले. यात ३ अंकांनी वाढ झालेली दिसून येते. जिल्ह्यात १९९१ मध्ये सर्वांत जास्त स्त्रियांचे प्रमाण हे धडगाव तालुक्यात होते ते १००८ स्त्री तर सर्वांत कमी प्रमाण अक्कलकुवा तालुक्यात होते ते ९५९ स्त्रिया होते. २०११ नुसार नंदुरबार जिल्ह्याचा तालुकानिहाय अभ्यास केला तर सर्वांत कमी स्त्रियांचे प्रमाण अक्कलकुवा तालुक्यात १९९१ ते २०११ मध्ये कमी झालेले दिसते, तर नवापुर तालुक्यात सर्वांत जास्त स्त्रियांचे प्रमाण १०१० एवढे आहे. अशा पद्धतीने नंदुरबार जिल्ह्यातील ६ तालुक्यांच्या लिंग-गुणोतराचा अभ्यास करण्यात आला आहे.*

### प्रस्तावना

प्रस्तुत शोध-निबंधामध्ये नंदुरबार जिल्ह्यातील लिंग-गुणोत्तराचा अभ्यास करण्यात आला आहे. त्यासाठी १९९१ ते २०११ या दशकातील जनगणना अहवालाची मदत घेण्यात आली आहे. तसेच १९९१ ते २०११ या कालखंडातील भारत, महाराष्ट्र व नंदुरबार जिल्ह्यातील लिंग-गुणोत्तराचा तुलनात्मक अभ्यास करण्यास आला आहे. लिंग-गुणोत्तर म्हणजे दर १००० पुरुषांमागे एकूण

स्त्रियांचे प्रमाण होय. २०११ च्या जनगणनेनुसार दर १००० पुरुषांमागे ९४० स्त्रिया हे भारतातील प्रमाण आहे. तर १९९१ मध्ये हेच स्त्रियांचे प्रमाण दर हजार पुरुषांमागे ९२७ एवढे होते. भारतात सर्वांत जास्त स्त्रियांचे प्रमाण हे १९११ मध्ये होते तर सर्वांत कमी स्त्रियांचे प्रमाण हे १९९१ दशकात होते. स्त्रियांच्या बाबतीत तुलनात्मक अभ्यास करताना जगात भारताचा २१ वा क्रमांक लागतो, तर महाराष्ट्राचा अभ्यास केला तर महाराष्ट्राचे लिंग-गुणोत्तर हे भारताच्या लिंग-गुणोत्तरापेक्षा कमी आहे. म्हणजेच ते ९२९ स्त्रिया दर १००० पुरुषांमागे असे आहे. नंदुरबार जिल्ह्याचा विचार केला तर सर्वात जास्त स्त्रियांचे प्रमाण हे १९११ साली दिसून येते ते म्हणजे १००० पुरुषांमागे ९७८ महिला एवढे प्रमाण होते तर ते १९९१ साली ९७५ महिला प्रति १००० पुरुषांमागे आहे. नंदुरबार जिल्ह्यातील लिंग-गुणोत्तराचा अभ्यास हा १९९१ ते २०११ या कालावधीतील आहे. याकाळात तालुक्यानुसार अभ्यास केला आहे. नंदुरबार जिल्ह्यात १९९१ व २०११ या साली एकूण ६ तालुके होते, या पूर्ण ६ तालुक्यांचा अभ्याचा करण्यात आला आहे.

**उद्दिष्ट्ये**

1. नंदुरबार जिल्ह्यातील लिंग गुणोत्तराचा अभ्यास करणे.
2. ६ तालुक्यांतील पुरुष व स्त्री लोकसंख्येचे प्रमाण ओळखणे.
3. ग्रामिण व शहरी भागातील लिंग गुणोत्तरातील फरक समजून घेणे.
4. विभिन्न जनगणनांच्या (1991, 2001, 2011 इ.) आधारे लिंग गुणोत्तरातील बदलाचा कालानुक्रमिक अभ्यास करणे.
5. नंदुरबार जिल्ह्याचा तुलनेत भारत व महाराष्ट्रतील लिंग-गुणोत्तराची वाढ कशी झाली आहे याचा अभ्यास करणे.

**अभ्यासक्षेत्र**

नंदुरबार जिल्हा महाराष्ट्राच्या उत्तर-पश्चिम सीमेवर स्थित आहे. तो उत्तर अक्षांश 21°00' ते 21°45' आणि पूर्व रेखांश 73°31' ते 74°32' दरम्यान पसरलेला आहे.सीमावर्ती राज्ये व जिल्हेउत्तर व पश्चिमेस - मध्यप्रदेश आणि गुजरात पूर्वेस - धुळे जिल्हा दक्षिणेस - नाशिक जिल्ह्यांची सीमा लागून आहे.लिंग-गुणोत्तराचा अभ्यास करण्यासाठी नंदुरबार जिल्ह्याची निवड करण्यात आली आहे.नंदुरबार हे सातपुडाच्या पायथ्या लगत वसलेले शहर असून जिल्ह्याचे भौगोलिक क्षेत्रफळ ३०३४ चौ.कि.मी.आहे.ते महाराष्ट्राच्या १.६३ टक्के आहे. राज्यात क्षेत्रफळानुसार जिल्ह्याचा २७ वा क्रमांक लागतो. २०११ मध्ये तालुक्यांची संख्या ६ होती, २०११ च्या जनगणनेनुसार नंदुरबार जिल्ह्याची लोकसंख्या १६,४८,२९५ आहे. त्यापैकी पुरुषांची

ISSN (Online): 3107-6165

लोकसंख्या ८३३१७० तर स्त्रियांची लोकसंख्या ८१५१२५ इतकी आहे.





**Fig.01** नंदुरबार जिल्हाचा स्थान दर्शक नकाश

**माहिती संकलन व संशोधन-पद्धती**

सदर संशोधन हे दुय्यम माहितीच्या आधारावर करण्यात आले आहे. यात जिल्हा जनगणना अहवाल १९९१ ते २०११ या संपूर्ण अहवालांचा अभ्यास करण्यात आला तसेच जिल्हा सामाजिक व आर्थिक अहवाल, जिल्हा सांख्यिकीय अहवाल, तसेच विविध शोधनिबंध, साप्ताहिकं, मासिकांचा वापर करण्यात आला आहे. या संशोधन लेखात नंदुरबार जिल्ह्यातील संपूर्ण ६ तालुक्यांचा अभ्यास करण्यात आला आहे. अभ्यास करत असताना जनगणना अहवालातील माहितीचे परीक्षण हे वेगवेगळ्या गणितीय पद्धतीनुसार केले आहे. तसेच यात स्तंभ-आलेखांचा व नकाशाचा वापर करण्यात आला आहे.

भारत, महाराष्ट्र आणि नंदुरबार जिल्ह्यातील स्त्री-पुरुष प्रमाणाचा अभ्यास केला आहे, तो १९९१ ते २०११ या काळातील. भारताचा विचार केला असता १९९१ पासून ते २०११ पर्यंत लिंग-गुणोत्तरात सतत घट होत गेलेली आहे. यात सर्वांत जास्त घट ही १९९१ या साली पाहवयास मिळते. तेव्हा स्त्रियांचे प्रमाण हे ९२७ एवढे कमी झाले होते, तर त्यात १६ अंकानी वाढ होऊन ते २०११ साली ९४० एवढे झाले आहे. १९९१ पासून भारताच्या लिंग गुणोत्तरात सुधारणा झालेली दिसुन येते, तर महाराष्ट्राच्या अभ्यासानुसार तो भारतापेक्षा कमी दिसून येतो. २०११ साली भारतातील स्त्रियांचे प्रमाण ९४० होते तर महाराष्ट्रातील स्त्रियांचे प्रमाण ९२९ एवढे होते म्हणजे

*The Research Analytics* ISSN (Online): 3107-6165
Volume 3, Special Issue 1, Jan 2026

भारताच्या प्रमाणापेक्षा १४ अंकानी कमी प्रमाण दिसून येते. १९९१ पासून महाराष्ट्रातील स्त्रियांचे प्रमाण हे सर्वच दशकांत कमी आलेले पाहवयास मिळते. १९९१ साली सर्वांत जास्त म्हणजे ९३४ स्त्रिया दर १००० पुरुषांमागे होत्या तर त्याचे प्रमाण २०११ ला घटून ९२९ स्त्रिया एवढे राहिले आहे. नंदुरबार जिल्ह्यातील स्त्रियांचे प्रमाण हे १९९१ साली भारत व महाराष्ट्रापेक्षा आधिक होते ते म्हणजे दर १००० पुरुषांमागे ९७५ एवढे स्त्रियांचे प्रमाण होते. तेच प्रमाण २०११ साली ९७८ दिसून येते. १९९१ व २०११ या साली नंदुरबार जिल्ह्यातील स्त्रियांचे प्रमाण सर्वांत कमी म्हणजे ९७५ एवढे दिसून येते. २०११ च्या जनगणनेप्रमाणे नंदुरबारची लोकसंख्या १६४८२९५ इतकी आहे. त्यात पुरुषांची लोकसंख्या ८३३१७० तर स्त्रियांची लोकसंख्या ८१५१२५ इतकी आहे. दर हजारी पुरुषांमागे स्त्रियांचे प्रमाण नंदुरबार,महाराष्ट्र तसेच भारतदेशात **१९९१ ते २०११** या कालखंडात क्रमाक्रमाने वाढ होत गेली आहे. सामाजिक समतेसाठी, सामाजिक स्वास्थ्यासाठी स्त्रियांना समान स्थान असणे, समान अधिकार प्रदान होणे हे अत्यावश्यक आहे. तेव्हाच स्त्री-पुरुष समानता झाली असे म्हणता येईल.

**सारणी-१: नंदुरबार जिल्ह्यातील तालुकानिहाय लिंग-गुणोत्तर, १९९१**

| अ. क्र. | तालुके | लोकसंख्या | पुरुष | स्त्रिया | लिंग गुणोत्तर स्त्री | स्त्री % |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | अक्कलकुवा | 133880 | 67813 | 66067 | 974 | 49.34 |
| २ | धडगाव | 96912 | 48997 | 48115 | 986 | 49.64 |
| ३ | तळोदा | 97931 | 49700 | 48231 | 970 | 49.24 |
| ४ | शाहदा | 288909 | 146765 | 142144 | 969 | 49.20 |
| ५ | नंदुरबार | 248363 | 125495 | 122868 | 979 | 49.47 |
| ६ | नवापुर | 196550 | 99455 | 97095 | 976 | 49.39 |
| | **जिल्हा** | **1062545** | **538020** | **524525** | **975** | **49.36** |

**स्रोत :** लेखक

१९९१ च्या जनगणनेच्या तुलनेत १९११ मध्ये ३ ने स्त्री-प्रमाणात वाढ झालेली दिसून येते. जिल्ह्यात १९११ मध्ये सर्वांत जास्त स्त्रियांचे प्रमाण हे नवापुर तालुक्यात होते ते १०१० स्त्री, तर सर्वांत कमी प्रमाण अक्कलकुवा तालुक्यात ते ९२६ स्त्रिया होते. केवळ एकच तालुक्यांचे लिंग-गुणोत्तर हे नंदुरबार जिल्ह्याच्या सरासरीपेक्षा कमी होते ते म्हणजे अकलकुवा तालुका ९२६ अनुक्रमे पाहवयास मिळते. बाकी सर्व ६ तालुक्यांमध्ये हे सरासरी ९६० पेक्षा जास्त आढळते. १९९१ च्या अहवालानुसार नंदुरबार जिल्ह्याचे स्त्री-पुरुष प्रमाण हे ३ अंकानी वाढ होऊन ते ९७८ झाले. त्यात सर्वांत जास्त स्त्रियांचे प्रमाण हे नवापुर तालुक्यात १०१० स्त्रिया असे होते तर सर्वांत कमी स्त्रियांचे प्रमाण हे अक्कलकुवा तालुक्यात आढळते. ते ९२६ स्त्रिया आहे. उर्वरित ५ तालुक्यांत स्त्रियांचे प्रमाण सरासरीपेक्षा जास्त आढळते.

**सारणी-२ : नंदुरबार जिल्ह्यातील तालुकानिहाय लिंग-गुणोत्तर, २००१**

| अ. क्र. | तालुके | लोकसंख्या | पुरुष | स्त्रिया | लिंग-गुणोत्तर स्त्री | स्त्री % |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | अक्कलकुवा | 177737 | 90706 | 87031 | 959 | 48.96 |
| २ | धडगाव | 136504 | 67967 | 68537 | 1008 | 50.20 |
| ३ | तळोदा | 25036 | 12780 | 12256 | 986 | 48.95 |
| ४ | शाहदा | 335346 | 170504 | 144570 | 967 | 43.11 |
| ५ | नंदुरबार | 294084 | 149514 | 144570 | 967 | 49.15 |
| ६ | नवापुर | 239507 | 120095 | 119412 | 994 | 49.85 |
| | **जिल्हा** | **1311709** | **663511** | **648198** | **977** | **49.41** |

**सारणी-३ : नंदुरबार जिल्ह्यातील तालुकानिहाय लिंग-गुणोत्तर, २०११**

| अ.क्र. | तालुके | लोकसंख्या | पुरुष | स्त्रिया | लिंग-गुणोत्तर स्त्री | स्त्री % |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | अक्कलकुवा | 245861 | 127633 | 118228 | 926 | 48.08 |
| २ | धडगाव | 195754 | 97902 | 97852 | 999 | 49.98 |
| ३ | तळोदा | 159654 | 79796 | 79858 | 1001 | 50.01 |
| ४ | शहादा | 407728 | 205913 | 201815 | 980 | 49.49 |
| ५ | नंदुरबार | 367446 | 186672 | 180774 | 968 | 49.19 |
| ६ | नवापुर | 271852 | 135254 | 136598 | 1010 | 5.24 |
| | **जिल्हा** | **1648295** | **833170** | **815125** | **978** | **49.45** |

२००१ च्या जनगणना अहवालानुसार ६ जिल्ह्यात एकूण ६ तालुके आहेत. १९९१ मध्ये तालुक्या था संख्या ६ होती २००१ च्या जनगणना अहवालानुसार नंदुरबार जिल्हात स्त्री-पुरुष प्रमाण हे ९७७ होते. तेव्हा सर्वांत जास्त स्त्रियांचे प्रमाण १००८ धडगाव तालुक्यात होते. तर सर्वांत कमी स्त्रियांचे प्रमाण हे ९५९ अक्कलकुवा तालुक्यात होती. सर्व जिल्ह्याचा अभ्यास करता जिल्ह्याच्या सरासरीपेक्षा जास्त स्त्रियांची संख्या होती, तर ९६० पेक्षा जास्त स्त्रियांची लोकसंख्या ही तळोदा, शहादा, नंदुरबार, धडगाव या चार तालुक्यांत ९८०, ९६८,९६८ आणि ९९९ अनुक्रमे पाहवयास मिळते. २०११ नुसार नंदुरबार जिल्ह्याच्या लिंग-गुणोत्तरात काही प्रमाणात फरक पडता तो ९७८ एवढा आहे. या साली सर्वांत जास्त स्त्रियांचे प्रमाण हे नवापुर तालुक्यात १०१० आढळून आले. तर सर्वांत कमी स्त्रियांचे प्रमाण अक्कलकुवा तालुक्यात ९२६ होते. जिल्ह्याच्या सरासरीपेक्षा जास्त स्त्रियांचे प्रमाण हे ४ तालुक्यांत होते. ९६० व त्यापेक्षा जास्त स्त्रियांचे प्रमाण ही तळोदा, शहादा, नंदुरबार,धडगाव तालुक्यांत आढळून येते.

**निष्कर्ष**

भारत, महाराष्ट्र आणि नंदुरबार जिल्ह्याचे लिंग गुणोत्तर हे १९९१ ते २०११ या कालावधीत स्त्रियांचे प्रमाण वाढ होताना दिसते. यात भारतातील १९९१ चे स्त्रियांचे प्रमाण हे ९२७ होते ते वाढून २०११ साली ९४० झाले झाले. म्हणजेच यात १३ अंकानी वाढ झाली आहे, तर महाराष्ट्रतील स्त्रियांचे प्रमाण १९९१ ला ९३४ एवढे होते.ते २०११ साली घट होऊन ९२९ एवढे झाले आहे. यात ५ अंकानी घट झालेली दिसून येते. नंदुरबारचा अभ्यास केला तर १९९१ मध्ये ९७५ स्त्रियांचे प्रमाण होते ते २०११ मध्ये ९७८ एवढे झाले. यात ३ अंकानी वाढ झालेली दिसून येते.

जिल्ह्याचा तालुकानिहाय अभ्यास केला तर सर्वांत कमी स्त्रियांचे प्रमाण अक्कलकुवा तालुक्यात १९९१ ते २०११ मध्ये कमी झालेले दिसते, तर नवापुर तालुक्यामध्ये सर्वांत जास्त स्त्रियांचे प्रमाण १०१० एवढे आहे. अशा पद्धतीने नंदुरबार जिल्ह्यातील ६ तालुक्यांच्या लिंग-गुणोत्तराचा अभ्यास करण्यात आला आहे.

**संदर्भ**

**1.** पवार, पी. आर.(2017): आदिवासी लोकसंख्येतील स्थलांतर व सामाजिक परिणाम : नंदुरबार जिल्ह्याचा अभ्यास. महाराष्ट्र भूगोल परिषद जर्नल, 34, 112-120.
**2.** शिंदे, एस. आर.(2019): नंदुरबार जिल्ह्यातील लोकसंख्या बदलांचे कालिक विश्लेषण. लोकसंख्या अभ्यास संशोधन, 5(2), 55-68.
**3.** डे, ए. ए., व कानिटकर, टी. (2011): लोकसंख्या अभ्यासाची तत्त्वे. मुंबई: हिमालय पब्लिशिंग हाऊस.
**4.** बोस, ए. (2001): भारतातील लोकसंख्या: बदलती दृष्टीकोन. नवी दिल्ली: बी. आर. पब्लिशिंग कॉर्पोरेशन.
**5.** चंदना, आर. सी. (2016):लोकसंख्या भूगोल. नवी दिल्ली: कल्याणी पब्लिशर्स.
**6.** प्रेमी, एम. के. (2001):भारत: लोकसंख्या व विकास. नवी दिल्ली: ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस.
**7.** सिंग, आर. एल. (संपा.). (2007): लोकसंख्या भूगोल. नवी दिल्ली: रावत पब्लिकेशन्स.
**8.** श्रीनिवासन, के. (1998): मूलभूत लोकसंख्याशास्त्र. नवी दिल्ली: सेज पब्लिकेशन्स.
**9.** देशमुख, व. ग. (2010): लोकसंख्या भूगोल. पुणे: विद्या प्रकाशन.
**10.**पाटील, श. र. (2014):भारतीय लोकसंख्या अभ्यास. कोल्हापूर: शिवाजी विद्यापीठ प्रकाशन.
**11.**जाधव, ब. न. (2009): लोकसंख्या व विकास. औरंगाबाद: कैलास प्रकाशन
**12.**देशमुख, बी. डी.(2015): महाराष्ट्रातील आदिवासी लोकसंख्येचा अवकाशीय अभ्यास. भूगोल संशोधन पत्रिका, 7(1), 23-39.
**13.**आदिवासी समाजाच्या विकासाचे सामाजिक व सांस्कृतिक पैलू.
**14.**स्त्री-पुरुष विषमता मापनासाठी जागतिक निकष व संदर्भ.
**15.**District Statistical Handbook - Nandurbar (Government of Maharashtra)
**16.**जिल्ह्याशी संबंधित अधिकृत आकडेवारी, लिंग गुणोत्तर व इतर सामाजिक निर्देशांक.
**17.**UNICEF Reports on Child Sex Ratio in India
**18.**बाल लिंग गुणोत्तर आणि त्यावर परिणाम करणाऱ्या सामाजिक प्रवृत्ती.
**19.**नंदुरबार किंवा उत्तर महाराष्ट्रावर आधारित प्रबंध, विशेषतः सामाजिकशास्त्रीय विभागात.
**20.**भारत सरकार - जनगणना अहवाल (Census of India,1991,2001, 2011)
**21.**जिल्हानिहाय लिंग गुणोत्तर, वयोगटानुसार माहिती.
**22.**लोकसंख्येचे घटक, लिंग गुणोत्तराचे सामाजिक संदर्भ.

**23.**डॉ. एस. आर. पाटील : “महाराष्ट्रातील आदिवासी समाजाचा सामाजिक अभ्यास”

**24.**नंदुरबारसारख्या आदिवासी जिल्ह्यांची समाजशास्त्रीय माहिती.

**25.**स्त्रियांचे सामाजिक स्थान, लिंग भेद, आणि त्यांच्या समस्यांचा आढावा.

**26.**राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण (NFHS - National Family Health Survey)

**27.**उगले व्हि. आर.(२०१३): "स्वातंत्रपूर्व व स्वातंत्र्योत्तर कालखंडातील महाराष्ट्रतील स्त्री-पुरुष प्रमाणाचे स्वरूप", महाराष्ट्र भूगोलशास्त्र संशोधन पत्रिका, खंड ३०, अंक १, जानेवारी-जुन २०१३, ९-१६.

**28.**बरकडे, ए. (२०१२): "डिक्लिनिंग लिंग रेशो- महाराष्ट्र राज्यासाठी विशेष संदर्भ असलेले विश्लेषण", रिसर्च गेट, भूविज्ञान संशोधन, खंड 3, अंक 1, 2012